**अपराध**

मीच माझ्या आत्मरंगी
ना कधी गंधाळले,
नयनात तुझिया मीच पण
अस्तित्व ही नाकारले ||

जपलीस तू पापण्यातून
तीच ओली पाकळी,
अवचित सामोरी तुला मी
तरी ही ती भावना कोवळी ||

अपराध माझा हाच की
मी कधी न वेचली फुले ,
तू परंतू काट्यात ही
अपराध माझे वेचले||

**----संध्या रानडे**